**महानगरपालिका निवडणुकांमध्ये**
**इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक-रानिआ/मनपा-२००४/प्र.क.१३/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ५ जानेवारी, २००५.

आ दे श

मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम २८, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ८अ व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम १३ब याद्वारे महानगरपालिकांच्या निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ११८अ, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम ७९(ब), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ८८(अ) मधील तरतुदींनुसार निवडणुकांसाठी होणारा खर्च महानगरपालिकांच्या निधीतून करणे आवश्यक आहे.

राज्य निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. हैद्राबाद या भारत सरकारच्या अंगीकृत व्यवसायाच्या सहकार्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र विकसित केले आहे. या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा काही पोटनिवडणुकीमध्ये यशस्वीरित्या वापर करण्यात आला आहे. या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये आवश्यकतेनुसार उमेदवार निवडण्याची सोय आहे. या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे एक वैशिष्टय म्हणजे यामध्ये वेगळी काढता येणारी मेमरी बसविलेली आहे. त्यामुळे निकाल लागल्यानंतर यंत्र पूर्ण सील करण्याची आवश्यकता राहात नाही. यंत्रामधील वेगळी काढता येणारी मेमरी काढून ती सील करुन कोषागारात ठेवता येते व निवडणूक याचिका झाल्यास ही मेमरी कोणत्याही मतदान यंत्रात बसवून त्यामधील निकाल पाहता येतो. या यंत्राची किंमत रुपये १०,५००/- आहे. वेगळी काढता येणा-या मेमरीमुळे मतदान यंत्रे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये कमी प्रमाणात लागतील.

निवडणूक प्रक्रिया अधिक गतिमान व्हावी, निकालावरील वेळ वाचावा व खर्चही वाचावा यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर निवडणुकीत करणे गरजेचे आहे. तसेच विधानसभा व लोकसभा निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर सरसकट सुरु झाल्याने महाराष्ट्रातील मतदारांकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर सुरु करण्याची मागणी करण्यात येत आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र खरेदी करण्यावरील सुरुवातीस खर्च फार जास्त वाटत असला तरी २ निवडणुकांमध्ये संपूर्ण खर्चाची वसुली होऊ शकते.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेतल्याने मतपत्रिकांची छपाई व मतमोजणीवर होणारा खर्च अतिशय कमी होईल, मतमोजणीच्यावेळी मतमोजणी कर्मचा-यांच्या जेवणाची सोय करायला लागते, मतमोजणीसाठी मोठा हॉल किंवा मंडपाची सोय करायला लागते, त्या खर्चात देखील बचत होईल.

राज्य निवडणूक आयोगाने नागपूर, नाशिक, अमरावती व पुणे या विभागातील महानगरपालिकांच्या बैठका विभागीय पातळीवर आयोजित केल्या होत्या. या बैठकांमध्ये सर्व महानगरपालिका आयुक्तांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर महानगरपालिका निवडणुकीत करण्यात यावा, असे मत व्यक्त केले. काही महानगरपालिकांनी स्वतः मतदान यंत्रे घेण्याची तयारी दर्शविली. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने सर्व बाजूंचा विचार केला असून, आयोग या निर्णयाप्रत आला आहे की, प्रत्येक महानगरपालिकेला तिच्या आवश्यकतेनुसार इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेण्यास सांगितले तर सर्वच महानगरपालिकांना फार जास्त खर्च येईल. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात वेगळी काढता येण्यासारखी मेमरी असल्यामुळे मतदान यंत्रे निवडणूक आटोपल्यानंतर इतरत्र हलवून वापरता येतील. या कारणामुळे सर्वसाधारणपणे ३५ ते ४० टक्के खर्च महानगरपालिकांना कमी करावा लागेल. उदा. मुंबई महानगरपालिकेने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे विकत घ्यावयाची ठरविल्यास रुपये ८.४० कोटी एवढा खर्च येईल. परंतु, राज्य निवडणूक आयोगाने यंत्रे विकत घेतल्यास मुंबई महानगरपालिकेला अंदाजे रुपये ५.०० कोटी एवढे अंशदान दयावे लागेल.

मतदान यंत्रे घेताना प्रत्येक महानगरपालिकांवर जास्त बोजा पडू नये, अशीही राज्य निवडणूक आयोगाची इच्छा आहे. त्यामुळे प्रत्येक महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रातील मतदारांची संख्या विचारात घेऊन रुपये ५/- प्रति मतदार याप्रमाणे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठी अंशदान दयावयाचे आहे. प्रति मतदार रुपये ५/- याप्रमाणे प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी येणारी रक्कम धनाकर्षाद्वारे (डिमांड ड्राफ्ट) असिस्टंट कमिशनर, स्टेट इलेक्शन कमिशन, मुंबई यांच्या नांवाने पाठविण्यात यावी. हा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) दिनांक-२८ फेब्रुवारी, २००५ पर्यंत प्राप्त होईल, अशा बेताने राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावा.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रत:-

१) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सर्व महानगरपालिका आयुक्त